# पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
# पोलीस शिपाई व पोलीस शिपाई बॅण्डस्मन पदभरती २०२२-२३
# प्रेस नोट

*******

मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती२०२२-२३/१७३/२०२३ दिनांक ०६/०६/२०२४ मध्ये देण्यात आलेल्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर पोलीस दलातील पोलीस शिपाई पदाची २१२ पदांपैकी ०८ पदे पोलीस शिपाई बॅण्डस्मन करीता राखीव ठेवण्यात आली आहेत. सदरचे रिक्त असलेली पदे भरण्याकरीता भरती प्रक्रिया दिनांक १९/०६/२०२४ ते २६/०६/२०२४ या कालावधीत घेण्यात आलेली आहे.

२/- मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमसं/प्रशि/पोशि भरती/बॅण्डस्मन/१७३/२०२३ दिनांक २५/०६/२०२४ मध्ये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे शारिरीक व मैदानी चाचणीमध्ये किमान ५०% गुण प्राप्त केलेल्या **६३१** बॅण्डस्मन उमेदवार यांची अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी ) घेण्याकरीता समिती गठीत करण्यात आली आहे. सदरील अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) **दिनांक ०८/०७/२०२४ ते १०/०७/२०२४** या कालावधीत (सकाळी ०९.०० पासुन ) **सोबतचे वेळापत्रकाप्रमाणे देवगिरी कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर** येथे घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | कौशल्य चाचणीचा प्रकार | गुण |
|---|---|---|
| १ | **वाद्यवादन (Practical Test )**<br>वाद्य वाजविण्यात पारंगत आहे ते वाद्य वाजविण्याचे कौशल्य प्रात्यक्षिक सादरीकरण. | ५० गुण |
| २ | वाद्यांचे / पाश्चात्य, भारतीय संगीताचे ज्ञान | २५ गुण |
| ३ | स्वरांचे ज्ञान, स्वर ओळखणे, स्वर किंवा लय गाता / वाजविता येणे | २५ गुण |
| | **एकुण गुण** | **१०० गुण** |

३/- मैदानी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या बॅण्डस्मन उमेदवार यांना बँण्ड पथकातील वाद्याची (क्लॉरनेट, सेक्सोफोन, ट्रम्पेट, इपोनियम, बेस ड्रम व साईड ड्रम ईत्यादी) माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक असुन उमेदवारांनी त्यांचे अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) मध्ये प्रात्यक्षिक सादरीकरण करणेकरीता आपलेकडील वाजविण्याचे वाद्य व माऊसपिस / रिड सोबत आणावे.

४/- सदर अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) ही १०० गुणांची असुन त्यापैकी उमेदवारास कमीत कमी ५० गुण प्राप्त होणे आवश्यक आहे. **सदरहु चाचणी अर्हता चाचणी असल्याने, सदरहु चाचणीत प्राप्त झालेले गुण गुणवत्ता यादी तयार करताना विचारात घेतले जाणार नाहीत.**

५/- अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त जागेच्या १:१० या प्रमाणात पात्र ठरणाऱ्या उमेवारांचीच लेखी परिक्षा घेण्यात येणार आहे.

स्थळ :- पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर
दिनांक :- ०४/०७/२०२४

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर